डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे

# फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे

महत्वाचे परिपत्रक -१

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ शिष्यवृत्ती २०२३-२४

आपल्या महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी चे (क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले अर्थसहाय्य योजना, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी अर्थसहाय्य योजना, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना, महात्मा ज्योतिराव फुले गुणवंत विद्यार्थी शिष्यवृत्ती योजना, स्वामी विवेकानंद विद्यार्थी सहाय्य योजना (पूरग्रस्त, दुष्काळग्रस्त, व आपत्तीग्रस्त भागातील विद्यार्थ्यांसाठी) या विद्यापीठ शिष्यवृत्तीचे ऑनलाईन अर्ज सुरु झाले आहेत. ज्या विद्यार्थ्यांनी शासनाच्या इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला नसेल तेच विद्यार्थी ह्या शिष्यवृत्तीसाठी पात्र राहतील. सदर विद्यापीठकडून मिळणारी शिष्यवृत्ती खालील अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी आहे. उदा. (BA, B.Sc., B.Sc.Comp Sci, B.Sc. Biotech, B.Sc. Animation, B.Sc.Micro/EVS, M.A. Economics/English/ Marathi, M.Sc.Botany, M.Sc.Geology, M.Sc.Physics, M.Sc. Microbiology, M.Sc.Bio-Chemistry, M.Sc. Organic Chemistry, M.Sc.Analytical Chemistry, M.Sc.CompSci.,M.Sc.Tech.IndustrialMaths./M.Sc.Biotech./M.Sc.Electronics./M.Sc.EVS.). वरील शिष्यवृत्ती संदर्भात सर्व माहिती व परिपत्रके नोटीस बोर्ड वर लावण्यात आलेले आहेत. त्याप्रमाणे योग्य त्या परिपत्रकाप्रमाणे शिष्यवृत्तीचा अर्ज भरणे विद्यार्थांनी क्रमप्राप्त आहे. अर्ज भरण्याची व महाविद्यालयाच्या कार्यालयात सादर करण्याची अंतिम दिनांक ०६-०३-२०२४ अशी आहे. तसेच वरील शिष्यवृत्ती योजनेचा फायदा विद्यार्थ्यास संपूर्ण पदवी काळात एकदाच आणि पदव्युत्तर काळात एकदा दिला जात असल्याने ज्या विद्यार्थ्यांनी सन २०२३-२४ मध्ये किंवा त्यापूर्वी शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला असेल अशा विद्यार्थ्यांनी पुन्हा अर्ज करू नयेत. **तसेच ज्या विद्यार्थ्यांना शासनाच्या (MAHA-DBT) शिष्यवृत्तीचा लाभ मिळत असल्यास अश्या विद्यार्थ्यांना सदर योजना लागू राहणार नाही, कृपया याची सर्वांनी नोंद घ्यावी.**

सविस्तर माहितीसाठी सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या संकेत स्थळावरील विविध शिष्यवृत्ती याचे अवलोकन करावे.

**Website:**http://bcud.unipune.ac.in/Scholarship/Applicant/Login.aspx

सदर योजनांचा लाभ घेण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांचे Eligibility No. महाविद्यालयाच्या ERP या संकेत स्थळावर अपलोड केले आहेत. विद्यापिठ विभाग /महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांचे अर्ज (Hard Copy) स्वीकारले जाणार नाहीत. काही बँकांचे विलीनी करण झाल्यामुले ज्या बंकांची खाती नव्या बँकेत विलीन झालेली आहेत अशा विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती जमा करण्यास अडचणी येतात. सबब विद्यार्थ्यांनी या संदर्भात चालू खाते (Current Account) व बचत खाते (Saving Account) व नव्याने असणारे खाते क्र. (Account No.), बँकेचे नाव (Bank Name), व IFSC Coad इ. माहिती विद्यार्थ्यांनी ऑनलाइन भरताना अचूक व काळजीपूर्वक भरणे आवश्यक आहे.

या योजने संदर्भातील आहर्ता आणि सविस्तर माहितीसाठी महाविद्यालयातील शिष्यवृत्ती विभागातील सुचना फलकाचे व महाविद्यालयाच्या www.fergusson.edu या संकेत स्थळावर वर अपलोड केलेल्या सूचनेचे (PDF) याचे अवलोकन करावे.

दिनांक : २६-०२-२०२४

प्राचार्य

प्रभारी प्राचार्य
फर्ग्युसन महाविद्यालय (स्वायत्त),
पुणे-४११००४.

**टिप :- विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यासक्रमात किमान ७५ % उपस्थिती प्रमाणपत्र, आपण शिकत असलेल्या संबंधित विभागाकडून घ्यावे . विभागाकडून प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर प्राचार्यांच्या सही साठी महाविद्यालयाच्या शिष्यवृत्ती विभागात जमा करावे.**